-: प्रेसनोट दिनांक - ०२/०१/२०२४ :-

**आरोपी लोकसेवक १) सुदाम दादाराव जाधव, वय - ५० वर्षे, जिल्हा अधीक्षक, जिल्हा अधीक्षक भुमी अभिलेख, कोल्हापूर वर्ग - १, सद्या रा. पुण्यप्रवाह सोसायटी, प्लॅट नं.३०३, नागळा पार्क, डायमंड हॉस्पीटल जवळ, कोल्हापूर, मुळ रा. खामसवाडी, ता.कळंब, जि.धाराशिव २) उदय लगमाना शेळके, वय- ४० वर्षे, वाहन चालक, जिल्हा भुमी अभिलेख कार्यालय कोल्हापूर वर्ग - ३, रा. कणेरीवाडी, ता. करवीर, जि.कोल्हापूर यांनी लाच मागणी करून स्विकारलेबाबत........**

---

तक्रारदार यांचे मालकीचे वडीलार्जीत जमीनीची मालकी ही नजरचुकीने चुलत चुलते यांचे नावे लागली होती ती कमी करण्याकरीता म्हणजेच शेतीबाबतचा फाळणी उतारा (पोट हिस्सा) दुरूस्त करून तक्रारदार यांच्या मालकीची शेतजमीन तक्रारदार आणि त्यांच्यासोबत असलेले त्यांचे अन्य सह हिस्सेदार यांच्या नावे लागणेकरता उपसंचालक भूमी अभिलेख पुणे या प्रादेशिक कार्यालयाकडे २०१८ मध्ये अर्ज केला होता. या तक्रारदार यांच्या वरील प्रलबिंत अर्जाची सुनावणी भुमी अभिलेख अधीक्षक कोल्हापूर यांच्या समक्ष सुरू करणेबाबत उपसंचालक यांनी आदेशीत केले होते. त्याप्रमाणे सदर अपिल अर्जाची सुनावणी मे. जिल्हा अधीक्षक भुमी अभिलेख जाधव साहेब यांचे समोर होवुन सदर अपीलाचे सुनावणीचा जो काय निर्णय असेल तो तुम्हाला कळविला जाईल असे आम्हाला सांगितले होते. सदर अपिलाचे कामाबाबत मी पाठपुरावा करीत होतो. तक्रारदार यांचे अपिलाचे काय निर्णय झाला याबाबत ते जिल्हा भुमी अभिलेख कोल्हापूर कार्यालयात जाधव साहेबांना भेटणेस गेले असता तेथे चालक म्हणुन नेमणुकीस असलेला उदय शेळके हा तक्रारदार यांना भेटुन त्यांचे कामाबाबत माहिती घेतली. त्यानंतर तक्रारदार यांना चालक उदय शेळके याने जाधव साहेबांना बोललो आहे तुमचे कामपुर्ण करून देणेसाठी जाधव साहेबांना बंद पाकीटातुन पंधरा हजार रूपये दयावे लागतील तसेच माझेही काहीतरी बघावे लागेल असे म्हणाले त्यावेळी तक्रारदार यांनी कायतरी ॲडजस्ट करा असे म्हणाले त्यावेळी उदय याने साहेबांचे साठी १०,०००/- रूपये दया व त्यांचेसाठी ५,०००/- हजार रूपये दया असा असे म्हणुन तक्रारदार यांचेकडे लाच मागणी केली.

तक्रारदार यांनी ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे दिलेल्या तक्रार अर्जाप्रमाणे पडताळणी केली असता पडताळणीमध्ये आलोसे क्र. व ०२ यांनी तक्रारदार यांना त्यांचे काम पुर्ण करून देणेसाठी आलोसे क्र.०१ जाधव यांचेसाठी १०,०००/- रूपये व त्याचे स्वत:साठी ५,०००/-रूपये लाच मागणी केल्याचे निष्पन्न झाले तसेच आलोसे क्र. ०१ यांनी तक्रारदार यांना उदय याने मागणी केलेप्रमाणे त्याला पैसे दिले का असे म्हणुन आलोसे क्र. ०२ यांनी तक्रारदार यांचेकडे मागणी केले लाच मागणीस संमती दिल्याचे निषन्न झाले.

त्यानंतर सापळा कारवाई आयोजीत केली असता पंच साक्षीदारांचे समक्ष तक्रारदार यांचेकडुन **आरोपी लोकसेवक १) सुदाम दादाराव जाधव, जिल्हा अधीक्षक भुमी अभिलेख, कोल्हापूर वर्ग - १ यांनी त्यांचेसाठी १०,०००/- रूपये** व आलोसे क्रमांक **०२) उदय लगमाना शेळके, वाहन चालक, जिल्हा भुमी अभिलेख कार्यालय**, वर्ग - ३ यांनी **स्वत:साठी ५,०००/-** रूपये स्विकारलेने त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले असुन सदर आरोपी अ.न. ०१ व ०२ यांचेविरूध्द लक्ष्मीपूरी पोलीस ठाणे, कोल्हापूर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरू आहे.

सदरची कारवाई श्री. अमोल तांबे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे. श्रीमती डॉ. शितल जानवे, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे श्री. विजय चौधरी, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांचे मार्गदर्शनानुसार तसेच श्री सरदार नाळे, पोलीस उप अधीक्षक यांचे मार्गदर्शनाखाली श्री बापु साळुंके पोलीस निरीक्षक, श्री प्रकाश भंडारे, स.पो.फॉ., पो.हे.कॉ. श्री विकास माने, पो.हे.कॉ. श्री सुनिल घोसाळकर, पो.ना.सुधीर पाटील, पो.ना. सुचिन पाटील, चा.पो.हे.कॉ. सुरज अपराध , चा.पो.हे.कॉ. विष्णु गुरव ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.

**सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की,लाचेच्या अथवा अपसंपदेबाबतच्या तकारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील कंमाकावर संपर्क साधावा.**

**१) मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री कमांक :- १८००२२२०२१**
**२) मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी कमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.**
**३) श्री.सरदार नाळे, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर मो.नं. ९६७३५०६५५५ कार्यालय दुरध्वनी कमांक - ०२३१/२५४०९८९.**
**४) हेल्पलाईन टोल फ्री कमांकः- १०६४.**
**५) व्हॉटस अप कमांक :- ७८७५३३३३३३.**